# रोजगार मेळाव्यातून नोकऱ्यांची सुवर्णसंधी - लोकनेते रामशेठ ठाकूर

पनवेल (प्रतिनिधी) आजचे तरूण हुशार व कर्तबगार आहेत, शैक्षणिक पात्रतेच्या माध्यमातून ते रोजगाराच्या अचुक संधीच्या शोधात असतात, अशा मल्हार रोजगार मेळाव्यातून त्यांना सुवर्णसंधी मिळत असते, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (दि.१६) खांदा कॉलनी येथे केले.

श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात 'मल्हार भव्य रोजगार मेळावा २०१५' आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उदघाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पदवी शिक्षण घेत असताना त्या सोबतीने तांत्रिक व विविध प्रशिक्षण घेणे काळाची गरज आहे, असे सांगून लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, वाढते औद्योगिकीकरण, झपाटयाने वाढणारी लोकसंख्या, व वर्तमानकाळातील रोजगारांची संधी लक्षात घेवून आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोजगार मेळाव्याचे आयोजन करून युवक युवतींना चांगली दिशा दाखवली आहे. या मेळाव्याचा हजारो तरूणांना लाभ होणार आहे, असे सांगून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उज्ज्वल भविष्यासाठी सर्व उपस्थित युवक-युवतींना मनपूर्वक शुभेच्छा दिल्या. पुढे त्यांनी बोलताना, केवळ जवळच्या परिसरातच नोकरी हवी आहे, ही मनातली संकल्पना काढून टाका, दुरवरच्या रोजगारातून मोठी संधी मिळू शकते, त्यामुळे राज्याबाहेर वेळ पडल्यास परदेशात नोकरी करण्याची ईच्छाशक्ती मनात ठेवा, असा मौल्लिक सल्लाही उपस्थित युवक-युवतींना दिला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांनी रोजगार मेळाव्याच्या आयोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे कौतुक केले. या आयोजनाबद्दल त्यांनी मनापासून आभार व धन्यवाद व्यक्त करत असल्याचे नमूद केले. आमदार प्रशांत ठाकूर हे पहिले आमदार आहेत की, ते तरूण कार्यकर्त्यांना विसरले नाहीत, सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम ते सतत करत आहेत. तरूणांच्या हातात देशाचे भविष्य आहे. चीनने जगात सगळयात जास्त प्रगती केली आहे ती स्किल्ड डेव्हलपमेंट तत्वातून. तेच गमक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखून स्किल्ड डेव्हलपमेंट तत्व देशात राबविण्याचे धोरण आखले असून त्यामुळे बेरोजगारांना रोजगार देण्याचे काम होणार आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखलेले गमक आमदार प्रशांत ठाकूर यांनी ओळखले आणि त्याच धर्तीवर रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगार देण्याचे काम ते करत आहे, असे सांगून राज्याबाहेर गेलेले कारखाने पुन्हा महाराष्ट्रात परत येत आहे, त्याचा फायदा तरूणांना मोठया प्रमाणात होणार आहे, असेही बाळासाहेब पाटील म्हणाले.

यावेळी नगराध्यक्षा चारूशिला घरत यांनी श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असून त्यांचे कार्य उल्लेखनीय व प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

पनवेल व आजूबाजूच्या परिसरातील कंपन्यांना आवश्यक असलेले मनुष्यबळ व तरूणांना आवश्यक असलेली नोकरी यांची सांगड घालण्यासाठी या मल्हार रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून सांगितले. काही कारखान्यांमध्ये कामगार आणि व्यवस्थापन यांच्यामध्ये अपेक्षांमुळे संघर्ष पहायला मिळतो. अशावेळी संप पुकारण्यासारख्या गोष्टी होतात, यातील महत्वाचे कारण एकामेकांडून असलेली अपेक्षा आहे. महत्वकांक्षी कामगार व व्यवस्थापनाच्या आडमोठया भुमिकेमुळे संघर्ष निर्माण होते. ते टाळण्यासाठी कंपनी व्यवस्थापन आणि कामगारांमध्ये सतत संवाद असणे गरजेचे आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून कामगार कायदे तयार केलेले असून कामगारांचे हित जपले पाहिजे यासाठी कामगार

मंत्री प्रकाश मेहता राज्य शासनाच्या माध्यमातून धोरण राबविणार आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. शिक्षण संस्थानी आपल्या परिसरात किती व कोणत्या उत्पादनाच्या कंपन्या आहेत, याची माहिती घ्यावी त्यांच्याकडून कोणते रोजगार उपलब्ध होईल याचीही माहिती घेत या सर्वाची सांगड घालत या परिसरातील युवक-युवतींना सहसा येथेच रोजगार मिळाला पाहिजे, यासाठी तशा प्रकारचे शिक्षण देण्याची गरज आहे. मनुष्यबळाची मागणी तसा पुरवठा झाला पाहिजे, यासाठी शिक्षण संस्थांनी पुढे येवून विविध कोर्सेसचे शिक्षण दिले पाहिजे. भविष्यकाळात शासनाने सुध्दा कॉलेज, शिक्षण संस्थाना आपापले कोर्सेस समाजाच्या गरजेनुसार देण्यासाठी परवानगी दिली पाहिजे, यासाठी निश्चितच शासनाकडे पाठपुरावा करणार आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी नमूद केले.

मेळाव्यास भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरूणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय.टी.देशमुख, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.गडदे, भाजपाचे प्रदेश सदस्य सी.सी.भगत, पेण तालुकाध्यक्ष प्रमोद कावतकर, युवा नेते परेश ठाकूर, नगरसेवक जयंत पगडे, नगरसेविका मंगला राणे, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच रत्नप्रभा घरत, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य संजय कांबळे, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, सिराज सय्यद, सुनिल रावते, हास्यसम्राट संजिवन म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते संजय गुरूजी, चंद्रकांत घरत, अनंतराव पाटील, प्रदीप देशमुख, के.ए.म्हात्रे, अनेष ढवळे, विश्वनाथ कोळी, बुधाजी ठाकूर, माजी नगरसेविका कल्पना राऊत, हिना भक्ता, पुनम कल्याणकर, सुधा नायक, युवा नेते प्रभाकर जोशी, दशरथ म्हात्रे, अमर पाटील, मिलिंद पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

या रोजगार मेळाव्यात फ्लिपकार्ट, सीसीआय, आयसीआयसीआय, कोटक महिंद्रा, ॲमेझॉन, मिंत्रा, एल ॲन्ड टी एन्फो, आय टेक मिडिया, ज्युबिलंट फार्मा, मायक्रोन मेट्रोपोलिस, वंडर एट कन्सलटींग, बजाज कॅपीटल, योगी मिडटाऊन, आयएनजी वयस्या, रिलायन्स रिटेल, हिन्दुस्थान टाईम्स, आयएसएस सिक्युरिटी सर्व्हिस, बीपीओ ॲन्ड केपीओ, युनिव्हर्सल ट्रेड, फिनटेक, वरटेक्स्ट, हॉटेल रॉयल तुलीप, अशा १00 हून विविध अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग होता.

मेळाव्यात ५६३९ उमेदवारांनी आपला सहभाग नोंदविला. कंपनी व्यवस्थापन व उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होवू नये व नियोजनात त्रुटी राहू नये, यासाठी ३00 हून अधिक स्वयंसेवकांच्या विविध समित्या सक्रीयतेने कार्यरत होत्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.सुनिल पाटील तर आभार प्रदर्शन किशोर चौतमोल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर चौतमोल, मयुरेश नेतकर, सतिश पाटील, सुशांत मोहिते, आशिष कडू, अमोल सैद, सुशांत मोहिते, हर्षवर्धन पाटील, हॅप्पी सिंग यांच्यासह अनेक युवा कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.